# उ प सं हा र

कोल्हापूर हे दक्षिण महाराष्ट्रातील सर्वात मोठे संस्थान होते. कोल्हापूर राज्याची स्थापना सन १७१० ला झाली व सन १९४९ पर्यंत कोल्हापूर राज्याचे अस्तित्व टिकून होते. भौगोलिक दृष्टया विचार करता कोल्हापूर राज्याच्या भौगोलिक वैशिष्टयामध्ये विविधता आढळून येते. राज्याच्या विकासामध्ये आणि लोकजीवनामध्ये भौगोलिक परिस्थितीचा महत्त्वाचा वाटा असतो. पोषक भौगोलिक परिस्थिती नसेल तर अती प्रयत्न करून देखील कधी कधी म्हणावा तेवढा आर्थिक विकास साधता येत नाही. याबाबतीत कोल्हापूर राज्याची भौगोलिक परिस्थिती आर्थिक उन्नतीसाठी अनुकूल होती असे म्हणावे लागेल. अर्थात त्यामध्ये विविधता आढळून येते. कोल्हापूर राज्याच्या पश्चिम विभागात सह्याद्रीच्या डोंगर रांगा जास्त होत्या. त्यामुळेच त्या डोंगराळ प्रदेशात लागवडीखालील जमीनीचे प्रमाण सहाजिकच कमी होते. पण हा भाग कोकण प्रदेशाला लागून असल्याने तेथे पावसाचे प्रमाण बऱ्यापैकी होते. त्यामुळे पश्चिम भागातील शेतजमीनीमध्ये भात, नागली सारखी पिके घेतली जात.

कोल्हापूर राज्याच्या पूर्व भागात मात्र उत्तम प्रकारची काळी जमीन असल्याने तेथे कापूस, तंबाखू, ज्वारीसारखी पिके घेतली जात असत. पूर्व भागातील पावसाचे प्रमाण पश्चिम भागाच्या तुलनेने कमी असे. तरीही जमीन सुपिक असल्याने शेतीतून बऱ्यापैकी उत्पन्न काढले जात असे. पण असे असले तरी पाऊस-पाण्याची परिस्थिती सदा सर्वकाळ चांगलीच होती. असे नाही तर काही वेळेला दुष्काळासारख्या संकटालाही या भागातील शेतकऱ्यांना तोंड द्यावे लागे. पण एकंदरीत तौलनिकदृष्टया अभ्यास केला

तर कोल्हापूर राज्याची भौगोलिक परिस्थिती आर्थिक विकासासाठी ब-याच अंशी अनुकूल होती असे म्हणावे लागेल.

कोल्हापूर राज्यातील समाजरचना ही यापूर्वीच्या समाजरचनेपेक्षा फार वेगळी नव्हती. समाजात रुढी परंपरा होत्या. जातीसंस्थेचे महत्व या अभ्यासाच्या कालखंडातही टिकून राहिले होते. ठराविक व्यवसाय ठराविक जातीतच केला जात असे. पुर्वापार चालत आलेल्या अंधश्रध्दा अजून समाजात रुढ होत्या. शिक्षणाचा गंध समाजात अजून पसरला नव्हता. पण कोल्हापूर राज्याचे शासन इंग्रज अधिका-याच्या देखरेखीखाली गेल्या-नंतर कोल्हापूर राज्यात शैक्षणिक प्रसार घडवून आणण्याचे खास प्रयत्न करण्यात आले.

सन १८५४ पर्यंत कोल्हापूर राज्यात शिक्षणाचा विशेष प्रसार झाला नव्हता. पण त्यानंतरच्या काळात शिक्षणप्रसारासाठी शाळा-हायस्कूले सुरु करण्यात आल्या. त्याचप्रमाणे उच्च शिक्षणाच्या प्रसारा-साठी राजाराम महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली. या प्रयत्नांचा परिणाम म्हणून सन १८९८ मध्ये कोल्हापूर राज्यात जवळ जवळ २२७ शाळा असून त्यात १३,८३० विद्यार्थी शिक्षण घेत होते. केवळ मराठीच शाळांची स्थापना करण्यात आली असे नाही तर इंग्रजी शाळांही सुरु करण्यात आल्या होत्या. शिवाय मराठी शाळेसाठी शिक्षक तयार करण्यासाठी ट्रेनिंग स्कूल सुरु करण्यात आले.

कोल्हापूर राज्याच्या सरकारने केवळ मुलांच्या शिक्षणासाठी प्रयत्न केला असे नव्हे तर मुलींच्या शिक्षणासाठी वेगळ्या शाळा स्थापन करुन मुलींच्या शिक्षणासाठीही प्रयत्न केला. ज्याना दिवसा शिक्षण घेणे

शक्य नव्हते अशा कामगारांसाठी रात्रशाळा सुरु करण्यात आल्या. इतर-हेचे प्रयत्न करुन समाजात शिक्षण प्रसार करुन समाजाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. समाजाचा विकास घडवून आणण्याचे काम कठीण आहे. हे ब्रिटिश अधिका-यांच्या सानिध्यामुळे लक्षात आले होते.

या अभ्यासाच्या कालखंडात ख्रिस्ती मिशन-यादेखील कोल्हापूर राज्यात प्रवेश केला. मिशन-यानी मानवतावादी कार्य करुन थोडयाफार प्रमाणामध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. पण धर्मांतर जास्तीत जास्त समाजाच्या कनिष्ठ वर्गात झाल्याचे दिसते. धर्मप्रसारा-बरोबरही शिक्षण प्रसार करण्याचा प्रयत्न केला.

औद्योगिकदृष्टया १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कोल्हापूर राज्यात प्रगती झालेली दिसते. विविध बलुतेदार आपले परंपरागत व्यवसाय करत असतच. त्याशिवाय इतर महत्वाच्या व्यवसायांची वाढ कोल्हापूर राज्यात या कालखंडात झाली. गुळ निर्मिती व साखर निर्मिती या बाबतीत कोल्हापूर राज्यात बरीच प्रगती झाली होती. कोल्हापूरी गुळाची निर्यात कच्छ, काठेवाड, गुजरात, मुंबई इत्यादी बाहेरच्या बाजारपेठात देखील या गुळाला मागणी असे. व्यापाराचे महत्व ओळखूनच शाहू महाराजानी रेल्वे स्टेशन-जवळ "शाहूपुरी" या व्यापारी पेठेची स्थापना केली. याशिवाय कागद व्यवसाय, तेल निर्मितीचा व्यवसाय, सराफी व्यवसाय, हातमाग व्यवसाय इत्यादी व्यवसाय कोल्हापूर राज्याच्या वेगवेगळया भागात चालत असत.

कोल्हापूर राज्याच्या महत्वाच्या शहरात आठवडी बाजार भरत व तेथे मालाची देवाण-घेवाण चालत असे. शाहू महाराज सत्तेवर आल्या-

नंतर त्यांनी आपल्या सुरुवातीच्या कालखंडात व्यापार वाढीकडे विशेष लक्ष दिले. सन १८९१ ला कोल्हापूर - मिरज रेल्वे सुरु झाल्यानंतर कोल्हापूरचा व्यापार वाढला. निपाणी, चिपळूण, राजापूर, मिरज, सांगली, इत्यादी भागांशी कोल्हापूरचे व्यापारी संबंध होते. मालाच्या किंमतीमध्ये सतत चढ उतार होत असत. तसेच राज्याचा महसूलदेखील सतत वाढत गेलेला दिसतो. पडीक जमीन लागवडीखाली आणल्याने लागवडी खालील जमीनीचे प्रमाण वाढले होते. त्याचप्रमाणे जंगलाच्या उत्पादनातून उत्पन्न या कालखंडात वाढलेले होते.

राज्यातील बहुतांश लोकांची उपजिवीका शेतीवर अवलंबून होती. पाऊस वेळच्यावेळी पडला तर शेतीतून ब-यापैकी उत्पादन निघत होते. पण काही वेळेला दुष्काळासारख्या संकटांना सामोरे जावे लागत असे. अर्थात दुष्काळावर मात करण्यासाठी रस्ते - पुल बांधणे, तलाव बांधणे, तलाव दुरुस्त करणे, शेतक-यांना कर्ज देणे, जनावरांना चारा उपलब्ध करुन देणे अशा योजना राज्यकर्त्यांनी केल्या होत्या.

शाहू महाराजांनी १८९४ मध्ये पन्हाळा व भुदरगड तालुक्यात वेलदोडे व कॉफीची लागवड करण्याचे प्रयत्न केले. सन १८५१ - १९०० या कालखंडात बरीच पडीक जमीन लागवडीखाली आणण्यात आली. त्यामुळे या कालखंडात लागवडीस योग्य जमिनीचे प्रमाणदेखील या कालखंडात सतत वाढले म्हणजेच शेतीच्या बाबतीत या कालखंडात विकास घडवून आणण्याचा प्रयत्न झाला हे स्पष्ट होते.

ब्रिटिशांचा अंमल भारतात चालू होण्याआधी भारतातील न्याय-व्यवस्थेत सुसूत्रता व एकवाक्यता नव्हती. एकाच प्रकारच्या गुन्ह्यासाठी

वेगवेगळ्या शिक्षा दिल्या जावयाच्या. पण ब्रिटिशांच्या शासनव्यवस्था भारतात लागू झाल्यापासून न्यायदान व शिक्षा देण्याच्या पध्दतीत सुसूत्रपणा व एक वाक्यता येवू लागली. काटेकोरपणे गुन्ह्यांची व गुन्हेगाराची चौकशी करुन कायद्याला अनुसरुन योग्य शिक्षा देण्याची पध्दत या काळात सुरु झाली. ब्रिटिश धर्तीवर कोल्हापूर राज्याची न्यायदान व्यवस्था सुधारण्यात आली होती. हिंदुस्थान सरकारने जे न्यायदान-विषयक विविध कायदे केले होते. त्या आधाराने कोल्हापूर राज्यातदेखील विविध कायदे करण्यात आले. एकूणच आधुनिक न्यायदान पध्दती या कालखंडात कोल्हापूर राज्यात सुरु करण्यात आली.

कोल्हापुरला प्राचीन काळापासून धार्मिक व ऐतिहासिक महत्व होते. हे महत्व सन १८५१-१९०० या कालखंडातही टिकून राहिले असल्याचे दिसते. कोल्हापुरची महालक्ष्मी, जोतिबा, डोंगर, नरसोबावाडी, चिंचली इत्यादी धार्मिक स्थळे व पन्हाळा, जुना राजवाडा, पांडवदऱ्याची लेणी इत्यादी ऐतिहासिक स्थळांमुळे कोल्हापुरला ऐतिहासिक महत्वदेखिल प्राप्त झाले होते.

सन १८५१-१९०० या कालखंडात इंग्रजांच्या देखरेखीखाली कोल्हापुरची शासनव्यवस्था चालू असल्याने राज्यात स्थानिक सुधारणा घडून आल्या. चलन व्यवस्थेत सुसूत्रपणा आणण्यात आला. त्याचप्रमाणे पोस्ट, तार ऑफीसे, पुस्तकालये इत्यादी आधुनिक सुधारणा कोल्हापूर राज्यात करण्यात आल्या. त्यामुळे आधुनिक कोल्हापुरचा प्रारंभ सन १८५० नंतर झाला असे म्हणता येईल.

.......